# महाराष्ट्र शासन
## जलसंपदा विभाग
## अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड
## कार्यकारी अभियंता, विष्णुपूरी प्रकल्प विभाग क्र.2जंगमवाडी नांदेड

उपविभागीय अभियंता/अधिकारी / कनिष्ठ अभियंता/शाखा अभियंता / सहाय्यक अभियंता श्रेणी-2 संवर्गातील सेवानिवृत्त अभियंत्यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षित कामाकरीता नियुक्ती करण्या बाबत

**(जाहिरात क्र.03/2022-23)**

महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.संकिर्ण-2715/प्र.क्र.100/13 मादाम कामा मार्ग हुतात्मा राजगुरु चौक मंत्रालय मुंबई-32 दिनांक 17/12/2016 नुसार दिलेल्या निर्देशानुसार खालील संवर्गातील जलसंपदा विभागातील सेवा निवृत्त अभियंता/अधिकारी यांची खालील प्रमाणे कंत्राटी पध्दतीने या मंडळातंर्गत अधिनस्त विभागीय कार्यालयामध्ये विवक्षीत कामासाठी नेमणुक करावयाची आहे.

| अ.क्र. | संवर्ग | पद संख्य |
|---|---|---|
| 1 | उपविभागीय अभियंता/अधिकारी (स्थापत्य) | 02 |
| 2 | कनिष्ठ अभियंता/शाखा अभियंता / सहाय्यक अभियंता श्रेणी-2 (स्थापत्य) | 04 |

जलसंपदा विभागातील सेवा निवृत्त अधिकारी यांची नेमणुक कंत्राटी पध्दतीने (11)अकरा महिन्यासाठी करावयाची आहे. सेवा निवृत्त अधिकारी नांदेड/ परभणी/हिंगोली जिल्हयातील सिंचन व बांधकाम तसेच अनुषंगीक विवक्षीत प्रकल्पाशी संबधित सर्वेक्षण, अन्वेषण संकल्पन व प्रकल्प अहवाल तयार करणे ई. प्रकारचे ज्ञान असावे. नांदेड/परभणी/हिंगोली जिल्हयात जलसंपदा विभगातील सेवेचा पुरेसा अनुभव असणे आवश्यक आहे. इच्छुक अर्जदारांनी विहित नमुन्यातील अर्ज **कार्यकारी अभियंता विष्णुपूरी प्रकल्प विभाग क्र.02/ जंगमवाडी नांदेड** या कार्यालयाकडे **दिनांक** 27/07/2022 **पर्यन्त सायंकाळी 5.00 वाजेपर्यन्त** प्राप्त होतील अशा बेताने पोस्टाव्दारे किंवा प्रत्यक्ष सादर करावी. अर्जाचे पाकीटावर "सेवा करार पध्दतीने विवक्षित कामाकरीता कंत्राटी पध्दतीवर नेमणूक करण्याबाबत"असे स्पष्ट लिहुन ज्या पदासाठी अर्ज केला आहे त्या पदाचे नांव लिहिण्यात यावे नियोजित दिनांकानंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही. सदर नेमणुक समितीव्दारे मुलाखती घेऊन करण्यात येतील. सदर नेमणुकांचे आदेश हे शासनाच्या /प्रादेशिक कार्यालयाच्या अंतीम मान्यतेनंतर निर्गमित करण्यात येतील.

**कंत्राटी पध्दतीने भरावयाच्या पदांचा व विवक्षीत कामांचा तपशिल**

| अ. क्र. | संवर्ग | विवक्षीत कामाचा तपशिल | जलंसपदा विभागातुन खालील पदावरुन सेवा निवृत्त झालेले अधिकारी सदर पदांकरीता अर्ज सादर करण्यास पात्र आहेत. |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| 1 | उपविभागीय अभियंता/अधिकारी | धरण व कालवा बांधकामे, सिंचन व्यवस्थापन, एकात्मिक जल आराखडे,प्रकल्प फेरनियोजन ISBIG Scheme. DRP-2 RRR,Pipe Distribution Network (PDN), भू-संपदान, क्षतिग्रस्त बांधकामे,भू-विकास कामे ई.विवक्षीत कामे. | उप विभागीय अधिकारी/ उपविभागीय अभियंता. |
| 2 | कनिष्ठ अभियंता/शाखा अभियंता /सहा. अभियंता श्रेणी-2 | धरण व कालवा बांधकामे, सिंचन व्यवस्थापन, एकात्मिक जल आराखडे,प्रकल्प फेरनियोजन ISBIG Scheme. DRP-2 RRR,Pipe Distribution Network (PDN), भू-संपदान, क्षतिग्रस्त बांधकामे,भू-विकास कामे ई.विवक्षीत कामे. | कनिष्ठ अभियंता/शाखा अभियंता/ सहाय्यक अभियंता श्रेणी-2/उप विभागीय अधिकारी/ उप विभागीय अभियंता. |

सदर नेमणुकांकरीता लागु असलेल्या अटी व शर्ती तसेच अर्जाचा नमुना हा महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागाच्या ई-जलसेवा या वेबसाईट http://wrd.Maharashtra.gov.in चे संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. तसेच विहीत नमुन्यातील अर्ज व अटी/शर्ती कार्यकारी अभियंता विष्णपुरी प्रकल्प विभाग क्र.02 जंगमवाडी नांदेड या कार्यालयात उपलब्ध आहेत.

(रा. मा. देशमुख)
कार्यकारी अभियंता तथा सदस्य सचिव
विष्णुपूरी प्रकल्प विभाग क्र.2
जंगमवाडी नांदेड

Rojgarmarathi.com

# सदर नेमणुका खालील सर्वसाधारण अटीं व शर्तींच्या अधीन राहतील

1. अर्ज करणा-या सेवा निवृत्त उपअभियंता / अधिकारी तसेच कनिष्ठ अभियंता / शाखा अभियंता / सहा.अभियंता श्रेणी – 2 यांनी ज्या पदासाठी अर्ज केलेला आहे त्या पदाची विवक्षीत कामांसाठी लागणारी विशेष अर्हता अथवा किमान तीन वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे.
2. सदर नेमणुका सर्वसाधारणपणे अकरा महिन्यांसाठीच राहतील. त्यापेक्षा जास्त कालावधी वाढविण्याची आवश्यकता भासल्यास संबंधितांचे कामकाज व आवश्यकता पाहुन नियुक्ती अधिकारी तसा निर्णय घेऊ शकतील. कामाची निकड व स्वरुप लक्षात घेवुन केंव्हाही नेमणुक रद्द करण्यात येईल. तसेच वरील जागांपैकी कांही जागांवर अल्प कालवधीसाठीच नेमणुक असले. त्याबाबतचा निश्चित कालावधी नेमणुक आदेशात स्पष्ट केला जाईल.
3. नियुक्त अर्जदाराला त्यांनी विहित कार्यपालन केल्यामुळे महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-2715/प्र.क्र.100/13 मादामा कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक मंत्रालय, मुंबई-400032 दिनांक 17.12.2016 मधील अटी व शर्तीप्रमाणे शासन निर्णयासोबत असलेल्या परिशिष्ट 'अ' नुसार मासिक परिश्रमीक अनुज्ञेय राहील.
4. करार पध्दतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधितांस शासनाच्या कोणत्याही विभागात / संवर्गात समावेशनाबाबत किंवा सामावुन घेण्याबाबत व नियमित सेवा किंवा इतर कोणताही लाभ मिळण्याच्या अधिकार नसेल याबाबत अर्जदाराने 100/- च्या मुद्रांकावर (Bond Paper) प्रतिज्ञालेख द्यावा लागेल.
5. करार पध्दतीवर नियुक्त करण्यात येणारे अभियंता / आधिकारी हे त्यांच्या वयाच्या 65 व्या वर्षापर्यंतच कार्यरत राहू शकतील. तथापि ज्या अभियंता / अधिकारी यांची सेवा त्यानंतर चालु ठेवणे आवश्यक आहे असे मत असले त्यांच्या सेवा सक्षम प्राधिका-यास एकस्तर वरिष्ठ अधिका-यांच्या / प्राधिका-यांच्या मान्यतेने पुढे चालु ठेवता येतील मात्र कोणत्याही परिस्थितीत करार पध्दतीने नियुक्ती करण्यात आलेल्या व्यक्ती वयाच्या 70 व्या वर्षापर्यतच कार्यरत राहू शकतील.
6. अर्ज करणा-या सेवा निवृत्त उपअभियंता / अधिकारी हे शारिरीक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असल्याबाबत जिल्हा शल्य चिकित्सक अधिका-याचे मुळ प्रमाणपत्र द्यावे लागेल.
7. करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अभियंता / अधिकारी यांस नेमुन दिलेली कामे पुर्ण करण्याची जबाबदारी संबंधित व्यक्तिची राहील त्याबाबतचे बंधपत्र / हमीपत्र तसेच अटी व शर्ती संबंधित उमेदवाराला मान्य आहेत याबाबत बंधपत्र उमेदवारारस 100/- च्या मुद्रांकावर (Bond Paper) देणे बंधनकारक राहिल.
8. अर्ज करणा-या सेवा निवृत्त अधिकारी / कर्मचा-या विरुध्द कोणत्याही प्रकारची विभागीय चौकशी व न्यायालयीन प्रकरण नसावे याबाबत अर्जदार हे ज्या कार्यालयातुन सेवा निवृत्त झाले आहेत त्या संबंधित कार्यालयाकडून तसे प्रमाणपत्र प्राप्त करुन सादर करणे बंधनकारक आहे.
9. नियुक्ती प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील त्याबाबतची कोणतीही तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही.
10. सदर उपअभियंता / अधिकारी हे त्यांच्यावर सोपविलेल्या आलेल्या कामात व्यत्यय निर्माण होईल् अशा कोणत्याही कामात गुंतलेले नसावे.
11. अशा उपअभियंता / अधिकारी यांनी गुंतलेले हितसंबंध (Conflict in interest) जाहीर करणे आवश्यक राहील.
12. करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदारास आवश्यक प्रसंगी दौरा करावा लागल्यास त्यांना त्यांच्या निवृत्तीच्या वेळेच्या वेतनमानास प्रवास भत्ता व दैनिक भत्ता लागु राहील.
13. अशा करार पध्दतीवरील उपअभियंता / अधिकारी यांनी त्यांना प्राप्त होणारे कागदपत्रे, माहिती, कामाबाबत व आधारसामुग्री बाबत गोपनियता पाळणे बंधनकारक राहील.

Rojgamarathi.com

14. नियुक्ती अधिकारी यांनी त्यांच्यावर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक राहील. करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदारास नेमून दिलेले काम समाधानकारक नसल्यास कोणतेही सबळ कारण न देता त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल.
15. अर्ज करणा-या सेवा निवृत्त अधिकारी / कर्मचारी यांनी त्यांच्या सेवेच्या शेवटच्या पाच वर्षाच्या गोपनिय अहवालाची प्रतवारी संबंधित कार्यालयाकडून प्रमाणित करुन तसे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. तसेच प्रशस्तीपत्र / नैपुण्यपूर्वक काम केले असल्यास तसे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडण्यात यावे.
16. क्षेत्रिय स्तरावर करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदारास सेवा काळामध्ये काही नैसर्गिक अपघात व काही आजार उद्भवल्यास कार्यालय / शासन बांधील राहणार नाही.
17. अर्ज करतेवेळी सेवा निवृत्त अधिकारी / कर्मचारी यांनी त्यांचे निवृत्तीवेतन मंजुरीचे महालेखापाल कार्यालयाचे आवश्यक साक्षांकित दस्तऐवज सादर करणे आवश्यक आहे.
18. करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदाराने नियुक्तीच्या ठिकाणी नियुक्ती आदेश निर्गमित झालेल्या दिनांकापासुन 15 दिवसाचे आत रुजू होणे बंधनकारक राहील अन्यथा सदर नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल.
19. मुलाखतीकरीता पात्र उमेदवारांना पत्र ई-मेलद्वारे पाठविण्यात येईल व भ्रमणध्वनीवर लघु संदशाद्वारे कळविण्यात येईल. यास्तव अर्जदारांनी आपल्या वैयक्तिक माहितीत त्यांचा ई-मेल पत्ता व भ्रमणध्वनी क्रमांक देणे बंधनकारक आहे. तसेच मुलाखतीसाठी पात्र उमेदवारांची यादी अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड यांच्या सुचना फलकावर प्रसिध्द करण्यात येईल. अंतिम निवड झालेल्या अर्जदारांची यादी वरील कार्यालयाच्या सुचना फलकावर तसेच संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. अंतिम निवड झालेल्या अर्जदारांना वैयक्तिक ई-मेलवर कळविण्यात येईल.
20. सदर नियुक्ती क्षेत्रिय स्थळावर संबंधित विवक्षीत कामासाठी करण्यात येत असून त्यासाठी योग्य उमेदवार उपलब्ध न झाल्यास काही किंवा सर्व पदे रिक्त ठेवण्याचा अधिकार समितीस राहील.
21. उमेदवाराने सदर नेमणुकीकरीता कोणत्याही राजकीय किंवा इतर बाह्य शक्तीच्या मार्गाने दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास संबंधीतांचा अर्ज तात्काळ रद्द करण्यात येईल.
22. करार पध्दतीने नियुक्त करण्यात येणा-या अधिका-यांस / कर्मचा-यास कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार राहणार नाहीत.
23. उपरोक्त अटीं व शर्ती व्यतिरिक्त / नियुक्ती प्राधिकारी वेळोवेळी ठरवतील त्या अटीं व शर्ती अंतिम व बंधनकारक राहतील.

(रा.मा.देशमुख)
कार्यकारी अभियंता तथा सदस्य सचिव,
विष्णुपूरी प्रकल्प विभाग क्र.2,
नांदेड.

Rojgarmarathi.com

# विहित नमुन्यातील अर्ज

**सेवा करार पध्दतीने विवक्षीत कामांसाठी सेवानिवृत्त सेवा निवृत्त उप अभियंता/अधिकारी/कनिष्ठ अभियंता/शाखा अभियंता/सहाय्यक अभियंता श्रेणी – 2 यांची नेमणूक करण्यासाठीचा अर्ज.**

प्रति,

मा.अधीक्षक अभियंता,
नांदेड पाटबंधारे मंडळ,
नांदेड.

उमेदवाराने अलिकडील काळातील स्वत:चे छायाचित्र येथे चिकटवावे.

अर्ज केलेल्या पदाचे नांव :- उप अभियंता/अधिकारी/कनिष्ठ अभियंता/शाखा अभियंता/सहाय्यक अभियंता श्रेणी – 2

| | | |
|---|---|---|
| 1. | अर्जदाराचे नांव | |
| 2. | कायमचा पत्ता | |
| 3. | दूरध्वनी क्रमांक / भ्रमणध्वनी सह (अनिवार्य) | |
| 4. | ई-मेल (अनिवार्य) | |
| 5. | सध्याचा पत्ता | |
| 6. | जम्न तारीख | |
| 7. | राष्ट्रीयत्व | |
| 8. | प्रवर्ग | |
| 9. | लिंग | |
| 10. | अवगत भाषा | |
| 11. | शैक्षणिक माहिती | |

12. अनुभुव

| अ.क्र. | हुद्दा व वेतन | कार्यालयाचे नांव व पत्ता | कामाचा अनुभव (विस्तृत स्वरुपात) |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |

13. सेवा निवृत्तीचा दिनांक :-

14. सद्य:स्थितीत कुठे काम करीत असल्यास तपशिल :-

15. प्रमाणपत्र :-

मला पूर्णपणे माहिती आहे की, पायाभूत सुविधा निर्मिती एमपॅनलमेण्ट द्वारे प्रकल्पाचे क्षेत्रिय कामाकरीता सेवा निवृत्त अधिकारी / कर्मचारी यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षीत कामासाठी उप अभियंता/अधिकारी/कनिष्ठ अभियंता/शाखा अभियंता/सहाय्यक अभियंता श्रेणी – 2 या पदाकरीता उमेदवारांची नियुक्ती करण्यात येणार आहे. सदर पद जाहिरातीत नमुद विवक्षीत कामासाठीच असून जास्तीत जास्त अकरा महिन्यांच्या कालावधीसाठीच आहे. कामाच्या निकडीनुसार नांदेड / परभणी / हिंगोली येथे माझी काम करण्याची तयारी आहे.

मी सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की, माझ्या माहितीप्रमाणे वर दिलेला तपशिल सत्य व अचूक आहे यामध्ये काही चुकीची माहिती आढळल्यास माझी निवड कोणत्याही क्षणी सुचना शिवाय रद्द होईल व मी शिक्षेस पात्र ठरेल याची मला पूर्ण जाणीव आहे.

ठिकाण :-

दिनांक :-

अर्जदाराचे नांव व स्वाक्षरी